# इतिहास विभाग अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षातील इतिहास विभागाचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

**अविष्कार स्पर्धा:**

आपल्या महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील द्वितीय वर्षातील कुमारी लक्ष्मी भोये व प्राजक्ता जगताप या मुलींनी दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ रोजी नाशिक येथील एचपीटी महाविद्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत भाग घेतला. त्यात त्यांनी ‘भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील दिंडोरी तालुक्याच्या योगदान’ या विषयावर त्यांनी आपला प्रकल्प सादर केला. यामध्ये स्वातंत्र्य सेनानी पुंजाजी (बाबा) आव्हाड, रघुनाथ कुलकर्णी यांचासह दिंडोरी तालुक्यातील स्वातंत्र्य सेनानींचा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील सहभाग अधोरेखित केला. अशा पद्धतीने दिंडोरी तालुक्यातील दुर्लक्षित इतिहास आपल्या प्रकल्पातून मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**डॉ. रामदास भोंग यांचे व्याख्यान संपन्न**

आपल्या महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ रोजी व्याख्यान संपन्न झाले. आयोजित व्याख्यानात डॉ. रामदास भोंग यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, इतिहास विषयाच्या कक्षा रुंदावत आहेत. इतिहास विषयामध्ये नवीन विचार प्रवाह येत आहेत. असे प्रतिपादन डॉ. रामदास भोंग यांनी केले. पूर्वी इतिहास हा फक्त राजे रजवाड्यांपुरता मर्यादित होता, परंतु अलीकडच्या काळात त्यामध्ये बदल होऊन त्याचा विस्तार होतो आहे. भारताचा सुरुवातीचा इतिहास ब्रिटिशांनी साम्राज्य वादी दृष्टीकोनातून लिहिला. त्याची प्रतिक्रिया म्हणून भारतीयांनी राष्ट्रवादी दृष्टीकोनातून इतिहास लिहायला सुरुवात केली. आणि त्यानंतर मार्क्सवादी दृष्टिकोन, सबल्टर्न दृष्टिकोन, अनल्स असे अनेक विचारप्रवाह इतिहासामध्ये रूढ होऊन इतिहासाच्या कक्षा रुंदावत आहेत. असे प्रतिपादन त्यांनी केले.

**डॉ. गणेश गिरी यांचे व्याख्यान संपन्न:**

इतिहास विभागाच्या वतीने डॉ. गणेश गिरी यांचे व्याख्यान संपन्न झाले. इतिहास आणि राज्यशास्त्र यांचा संबंध या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले. डॉ. गणेश गिरी यांनी इतिहास आणि राज्यशास्त्र यांचा संबंध कसा आहे हे सांगितले. आजचे राजकारण उद्याचा इतिहास होत असतो, राज्यशास्त्र हा इतिहासाचा एक सायाय्यकारी विषय आहे. इतिहास लेखन करीत असताना राजकीय घडामोडींचा अभ्यास करावा लागतो आणि त्यावेळी इतिहासाच्या विद्यार्थाला राज्यशास्त्राचा आधार घ्यावा लागतो. असे प्रतिपादन डॉ. गणेश गिरी यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. सुनील उगले हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तुकाराम भवर तर आभार प्रदर्शन इतिहास विभागप्रमुख प्रा. चंद्रप्रकाश कांबळे यांनी मानले.

**शहीद दिन साजरा:**

महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने शहीद दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र सांगळे यांच्या हस्ते शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र सांगळे यांनी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या क्रांतीकार्याचा इतिहास सांगितला. अतिशय कमी वयातील या तरुण देशभक्तांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारी मार्गाचा अवलंब केला. या तरुणांनी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी पब्लिक सेफ्टी बिलाच्या विरोधात सज्जातून सभागृहात बॉंब फेकले, हवेत गोळ्या झाडल्या व निषेधपत्रके फेकली. सायमन कमिशन लाहोर येथे आले असताना तिथे लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली उग्र निदर्शने झाली. त्या वेळी झालेल्या लाठीहल्ल्यात लालाजी घायाळ झाले आणि त्यातच नंतर त्यांचे निधन झाले .या घटनेमुळे देशभर असंतोषाची तीव्र लाट पसरली. देशभक्तीने प्रेरित झालेल्या भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांनी लालाजींच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी त्या हल्ल्याचा मुख्य सुत्रधार जे. पी. सॉंडर्सची गोळ्या घालून हत्या केली. त्यानंतर त्यांना अटक होऊन २३ मार्च १९३१ रोजी या तीन तरुणांना ब्रिटिशांनी फाशी दिले. हा दिवस दरवर्षी शहीद दिन म्हणून ओळखला जातो. या देशभक्तांच्या बलिदानाने देशाला

स्वातंत्र्य मिळाले. म्हणून आपण सदैव त्यांच्या विचारांची जोपासना करून त्यांचे नित्य स्मरण केले पाहिजे. यातील शिवराम हरी राजगुरू हे पुणे जिल्ह्यातील खेड येथील होते हि आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची आणि गौरवाची गोष्ट आहे. या गौरवशाली परंपरेचे आपण पाईक झाले पाहिजे असे यावेळी प्राचार्य सांगळे यांनी सांगितले. या प्रसंगी प्रा. शिवाजी साबळे, प्रा. रोहित साळवे, प्रा. निलेश भारसाकळ, प्रा. वटाणे, प्रा. योगिता ढाकणे, प्रा. मोनिका कुमावत, श्री. दीपक इप्पर, योगेश बोडके, श्री. मोबीन सय्यद, चव्हाण, शेख मॅडम व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. इतिहास विभागप्रमुख प्रा. चंद्रप्रकाश कांबळे यांनी प्रास्ताविक व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर प्रा. रामदास जगताप यांनी आभार मानले. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बरोबरच विद्यार्थी उपस्थित होते.

**भित्तीपत्रक स्पर्धा:**

महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे शहीद दिनाचे औचित्य साधून शहिदांच्या जीवनावर आधारित भित्तिपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. भित्तीपत्रकाचे अनावरण महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील उगले यांच्या हस्ते करण्यात आले. सदर स्पर्धेमध्ये इतिहास विभागातील विद्यार्थिनी कुमारी लक्ष्मी भोये प्रथम तर तृतीय वर्षातील समाधान लिलके, नितीन खांडवी व यज्ञान वैष्णव यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. सदर स्पर्धेसाठी डॉ. प्रल्हाद दुधाने व डॉ. रुपाली शिंदे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रा. तेजस्विता मुंढे, प्रा. तुकाराम भवर यांच्यासह विद्यार्थी मोठ्यासंख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र सांगळे यांच्या संकल्पनेप्रमाणे हा उपक्रम घेण्यात आला. इतिहास विभागप्रमुख प्रा. चंद्रप्रकाश कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांच्या जीवनावर भित्तीपत्रके सादर करून शहिदांना आदरांजली वाहिली.

प्रा. चंद्रप्रकाश कांबळे

इतिहास विभागप्रमुख